# जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : chandrapur.rdc@gmail.com
फोन क्रमांक – 07172-250659

क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/464
दिनांक :- 11 मे, 2020

---

प्रति,

1.पोलीस अधिक्षक,
चंद्रपूर
2.उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
चंद्रपूर
3.पोलीस निरीक्षक,
वाहतुक नियंत्रण शाखा, चंद्रपूर

विषय:- **लॉकडाऊन दरम्यान फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 चे कलम 144 (1) (3) अन्वये निर्गमित केलेल्या आदेशांची अंमलबजावणी करण्याबाबत.**

संदर्भ :- या कार्यालयाचे आदेश क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/461, दिनांक 10 मे, 2020

फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 (1974 चे 2) चे कलम 144 चे अन्वये जिल्हयात दिनांक 11 मे, 2020 पासून ते 17 मे, 2020 पर्यंत प्रवास व प्रवासी वाहतुकी संबंधाने खालील प्रमाणे संदर्भीय आदेशान्वये आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे.

i) **जिल्हयातंर्गत प्रवास करण्यास (दुचाकी/चारचाकी वाहनाने) नागरीकांस कोणत्याही परवानगीची आवश्यकता राहणार नाही. परंतु चारचाकी वाहनाच्या बाबतीत वाहनचालकांसह केवळ 02 प्रवासी वैध राहील आणि वाहनामध्ये सॅनीटायजर्स ठेवुन प्रवास करणा-या व्यक्तीस मास्कचा वापर करणे बंधनकारक राहील तसेच दुचाकी करिता केवळ दुचाकी चालक यांनाच वाहन चालविण्यास परवानगी असेल.**

ii) **महानगरपालिका, नगरपालिका/नगर पंचायत क्षेत्राकरिता प्रवासी वाहतुकीकरिता रिक्शा/ॲटोरिक्शा चालक व दोन प्रवाश्यांसह रिक्शा/ॲटोरिक्शा ची वाहतुक सुरु राहील परंतु रिक्शा/ॲटोरिक्शा मध्ये सॅनिटायजर ठेवणे व मास्कचा वापर करणे बंधनकारक असेल. सदर वाहतुक ही ग्रामीण क्षेत्राकरिता लागु राहणार नाही.**

iii) **दुचाकी/चारचाकी/रिक्शा/ऑटोरिक्शा याव्दारे सायंकाळी 07.00 ते सकाळी 07.00 या कालावधीत प्रवास करता येणार नाही.**

उपरोक्तनुसार दिलेल्या आदेशाची प्रसिध्दी आणि तंतोतंत पालन होण्याकरीता आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

सोबत संदर्भीय आदेशाची प्रत संलग्न केलेली आहे.

सदरचा आदेश संपुर्ण जिल्हयामध्ये दिनांक 11/05/2020 ते दिनांक 17/05/2020 या कालावधीकरिता लागु राहील.

(डॉ. कुणाल खेमनार)
जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर

**प्रतिलीपी :- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव**

1. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर
2. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
3. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
4. मुख्याधिकारी, नगर परिषद/ नगर पंचायत (सर्व)
5. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर

जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर